# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द

तालुका आंबेगाव, जि. पुणे - ४१२ ४०५

दूरध्वनी ०२१३३ २३०५८२, ई मेल - gcoeara@gmail.com, website – www.gcoeara.ac.in


जा. क्र. शाअवसंमअ / भांडार / २०१९ / 228 2290 दि. ०४-०६-२०१९

## निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त

शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द येथील मुलींच्या वसतिगृहातील खानावळ चालविण्यासाठी दि. ३१-०५-२०१९ रोजी ई निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्या ई निविदेच्या अनुषंगाने सदर खानावळ चालविण्यासाठी संभाव्य इच्छुक निविदाकारांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी निविदापूर्व बैठक दि. ४ जून २०१९ रोजी सकाळी ११-०० वाजता संस्थेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील बैठक सभागृहात पार पडली. सदर बैठकीस हजर असलेले अधिकारी तसेच इच्छुक निविदाकार यांची यादी सोबत जोडली आहे.

बैठकीच्या सुरुवातीस डॉ. ए. एस. पंत, प्राचार्य यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले तसेच सर्व उपस्थितांचे स्वागत करून त्यांना बैठकीचा उद्देश समजावून सांगितला. त्यानंतर डॉ. श्रीमती के. व्ही. ठाकूर, सहाय्यक प्राध्यापक, अणुविद्युत तथा वसतिगृह कुलमंत्री यांनी सदर निविदा सूचनेच्या अनुषंगाने महत्वाच्या तारखा, अटी व शर्ती, नियमांच्या उल्लंघनाबाबत आकारणी करण्यात येणारा दंड, मेनू कार्ड, तांत्रिक निविदा व वाणिज्यिक निविदा यासाठी आवश्यक कागदपत्रे या सर्व माहितीचे वाचन केले आणि तद्नंतर बैठकीस उपस्थित असलेल्या इच्छुक निविदाकारांना त्याबाबत काही शंका असल्यास त्याबाबत निरसन करून घेण्याचे सूचित केले.

तद्नंतर इच्छुक निविदाकारांनी / संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्याबाबत संस्थेकडून करण्यात आलेले निरसन याचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

१) **मासिक दराची वसुली** - कंत्राटदारांनी कुपन पद्धत वापरल्यास सदरची कुपन्स किती काळ वैध असावीत? अशी शंका उपस्थित करण्यात आली असता त्या त्या महिन्याची कुपन्स ही फक्त त्या महिन्यासाठीच वैध असतील असे स्पष्ट करण्यात आले.

२) **जेवणाची वेळ** - सुट्टीच्या दिवशी जेवणाची वेळ काय राहील? अशी शंका उपस्थित करण्यात आली असता सुट्टीच्या दिवशी मुलींच्या विनंतीनुसार सकाळच्या जेवणाची वेळ साधारणपणे एक तास पुढे म्हणजे सकाळी १० ते दुपारी १२ अशी राहील असे स्पष्ट करण्यात आले.

३) **उपभोग्य पदार्थांचा दर्जा** - खानावळीत वापरल्या जाणाऱ्या सर्व उपभोग्य पदार्थांचा दर्जा चांगला असण्याच्या दृष्टीने निविदेत नमूद करण्यात आलेल्या तक्त्याप्रमाणे फक्त ब्रांडेड पदार्थ वापरण्यात यावेत, अन्यथा दंड करण्यात येईल असे स्पष्ट करण्यात आले.

४) **खाणावळीतील स्वच्छता** - खानावळीत नेहमीच स्वच्छता राखणे आवश्यक राहील असे स्पष्ट करण्यात आले.

५) **गेस्ट चार्जेस** - गेस्ट म्हणजे नेमके कोण असतील याबाबत निविदेतील मुद्दा क्र. २.६ येथे स्पष्टीकरण देण्यात आले आहे असे स्पष्ट करण्यात आले. गेस्ट चार्जेस हे जेवणात गोड

पदार्थासह असतील किंवा कसे? अशी शंका उपस्थित करण्यात आली असता असे स्पष्ट करण्यात आले की गेस्ट चार्जेस म्हणजे त्या दिवशीच्या मेनू नुसार एका वेळच्या जेवणासाठी गेस्टने अदा करावयाची रक्कम असेल.

६) **तांत्रिक निविदेतील अनु. क्र. ७ आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ चे आयकर विवरण पत्र** - यासंबंधी नेमके कोणते कागदपत्र जोडावे? अशी शंका उपस्थित करण्यात आली असता असे स्पष्ट करण्यात आले की या मुद्द्याच्या अनुषंगाने किमान आयकर विवरणपत्र सादर केल्यानंतर मिळालेल्या पोच पावती (Acknowledgement) ची प्रत जोडण्यात यावी.

७) **तांत्रिक निविदेतील अनु. क्र. ८ भागीदारी करारनामा** - याबाबत असे स्पष्ट करण्यात आले की निविदाकारांनी भागीदारी करारनामा असल्यास त्याची प्रत जोडावी, अथवा भागीदारी करारनामा नसल्यास तसे स्वत:च्या लेटरहेडवर घोषित करून त्याची प्रत जोडावी. मात्र यापैकी एक कागदपत्र जोडणे अत्यावश्यक राहील.

८) **व्यावसायिक निविदेबाबत प्रपत्र** - याबाबत असे स्पष्ट करण्यात आले की इच्छुक निविदाकारांनी सदरच्या प्रपत्रातील अनु. क्र. १ तसेच अनु. क्र. २ या दोन्हीबाबत स्वतंत्रपणे दर नमूद करणे अत्यावश्यक राहील.

९) **निविदेतील मुद्दा क्र. २.१४** - याबाबत असे स्पष्ट करण्यात आले की "खानावळीत तयार केलेले अन्न १२ तासांनंतर वापरू नये" या ऐवजी "खानावळीत तयार केलेले अन्न ६ तासांनंतर वापरू नये" असे वाचण्यात यावे.

वरील प्रमाणे चर्चा झाल्यानंतर मा. प्राचार्यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व बैठक संपन्न झाल्याचे घोषित केले.

1) प्रा. एस. डी. जोशी [signature]

2) डॉ. डी. आर. पानगव्हाणे [signature] 04-6-19

3) डॉ. प्रदीप के. देशमुख [signature] 4/6/19

4) डॉ. के. व्ही. ठाकूर [signature] 4/6/19

[signature] 4/6/19

**प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय**
**अवसरी (खुर्द), ता.आंबेगांव, जि.पुणे**

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी खुर्द

तालुका आंबेगाव, जि. पुणे - ४१२ ४०५
दूरध्वनी ०२१३३ २३०५८२, ई मेल - gcoeara@gmail.com, website – www.gcoeara.ac.in

**मुलींच्या वसतिगृहातील खानावळ चालविण्यासंबंधी निविदापूर्व बैठक दि. ०४-०६-२०१९**
**निविदापूर्व बैठकीस उपस्थित निविदाकार व अधिकारी यांची यादी**

| अनु. क्र. | उपस्थित निविदाकार व अधिकारी |
|---|---|
| | **निविदाकार** |
| १ | श्री. निखील सातकर, मे. जाधव केटरर्स, राजगुरुनगर, जि. पुणे |
| २ | श्री. नरेंद्र चौहान, मे. स्नेह सर्व्हिसेस, पुणे |
| ३ | श्री. रामदास शिंदे, झटका खानावळ, अवसरी खुर्द, जि. पुणे |
| ४ | श्री. किशोर देशमुख, मे. ओम केटरर्स, मंचर, जि. पुणे |
| ५ | श्रीमती शेख शहानुर फारूक, प्रेरणा महिला स्वयं. बचत गट, मंचर, जि. पुणे |
| ६ | सौ. तबस्सुम खालिद इनामदार, एकता महिला स्वयं. बचत गट, मंचर, जि. पुणे |
| | **अधिकारी** |
| १ | डॉ. ए. एस. पंत, प्राचार्य |
| २ | प्रा. एस. व्ही. जोशी, प्राध्यापक व विभाग प्रमुख, यंत्र अभि. |
| ३ | डॉ. डी. आर. पानगव्हाणे, प्राध्यापक व विभाग प्रमुख, स्वयंचल अभि. |
| ४ | डॉ. पी. के. देशमुख, सहयोगी प्राध्यापक, संगणक अभि. |
| ५ | डॉ. श्रीमती के. व्ही. ठाकूर, सहाय्यक प्राध्यापक, अणुविद्युत तथा कुलमंत्री, मुलींचे वसतिगृह. |

५।६।१९

**प्राचार्य**
**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय**
**अवसरी (खुर्द), ता.आंबेगांव, जि.पुणे.**